जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१८/ 1017
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 14 /०२/२०१८

प्रति,

संस्थाचालक/प्राचार्य,
सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषयः- शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC) जुन - २०१८**
विद्यार्थ्यांची ऑनलाईन (ONLINE) नोंदणी करणेबाबत..
(मॅन्युअल टायपिंग व लघुलेखन परीक्षा)

संदर्भ:- १) या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/७६०३, दि.२६/१२/२०१७ चे पत्र.
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३६/एसडी-२, दिनांक १६ नोव्हेंबर २०१७.

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, जीसीसी परीक्षा जुन-२०१८ साठी टंकलेखन व लघुलेखन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी www.mscepune.in या संकेतस्थळावर दि.१५/०२/२०१८ ते दि. १५/०३/२०१८ पर्यंत online नोंदणीची लिंक देण्यात येत आहे.

संदर्भ क्र.१ नुसार दि.१५ जानेवारी २०१८ पर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, असे संस्थांना कळविण्यात आले होते. संस्थांनी चालू सत्रासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने या कालावधीत करावी. नोंदणीकृत विद्यार्थ्यांनाच जीसीसी जुन-२०१८ च्या परीक्षेचे फॉर्म भरता येतील, याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये राज्यातील शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरू ठेवण्यास ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थाचालकांनी शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २४ एप्रिल २०१७ नुसार पूर्वअटींचेही काळजीपूर्वक अवलोकन करुनच विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत करण्याची दक्षता घ्यावी.

सर्व संस्थाचालकांनी परीक्षार्थीची ऑनलाईन नोंदणी करताना विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक नोंदवावा आणि प्रती विद्यार्थी नोंदणी शुल्क रु.१००/- परिषदेच्या खाली दिलेल्या बँक खाते क्रमांकावर ऑनलाईन पध्दतीने भरावे.

| | |
|---|---|
| बँकेचे नाव :- | HDFC BANK LTD , KARVE NAGAR, PUNE |
| बँक खाते क्रमांक :- | 50100226736250 |
| बँक IFSC कोड :- | HDFC0001115 |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत :-
१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक, मुंबई (उ/द/प)